महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

# सुधारीत वेळापत्रक - जाहीर सुचना

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता राज्य सीईटी कक्षामार्फत उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षांचे ऑनलाईन नोंदणी अर्ज स्वीकृती सुरु करण्यात आलेली आहे.

देशपातळीवर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राष्ट्रिय परीक्षा एजन्सीमार्फत घेण्यात येणाऱ्या जेईई (मेन) या परीक्षेचे वेळापत्रक दिनांक ०६/०४/२०२२ रोजी प्रसिध्द् करण्यात आलेले आहे. सदर वेळापत्रकाचे अवलोकन केले असता या कार्यालयातर्फे घेण्यात येणाया एमएचटी-सीईटी २०२२ या परीक्षेच्या (दिनांक २०,२१,२२ व २३ जून, २०२२) या तारखा एकसमान असल्याचे दिसून आले.

जेईई (मेन) व नीट या सामाईक प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकाचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन एमएचटी-सीईटी २०२२ ही परीक्षा जुलै महिन्यात न घेता माहे ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्याचे निश्चित करण्यात आले.

दिनांक २६/०४/२०२२ रोजी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या परीक्षा ०१ जुन ते १५ जुलै, २०२२ या कालावधीत घेण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्याअनुषंगाने दिनांक २१/०४/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारीत वेळापत्रकामध्ये विद्यार्थ्यी हितास्तव पुन्हा सुधारणा करण्यात आलेली असून सुधारीत अंदाजित वेळापत्रक विद्यार्थ्यी, पालक व संस्था यांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात येत आहे.

अभ्यासक्रमनिहाय सीईटी परीक्षांचे माहिती पुस्तिका,वेळापत्रक आणि अभ्यासक्रम राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर www.mahacet.org उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उच्च शिक्षण विभागाचे विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षाचे ऑनलाईन अर्ज नोंदणी १९ मार्च, २०२२ ते १२ एप्रिल, २०२२ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच सीईटी परीक्षा अंदाजे दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ ते २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

तंत्रशिक्षणांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षाचे ऑनलाईन अर्ज नोंदणी १० फेब्रुवारी, २०२२ ते १५ एप्रिल, २०२२ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच संबंधीत सामाईक प्रवेश परीक्षा अंदाजे दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ ते २५ ऑगस्ट, २०२२ त्याचप्रमाणे एमएचटी-सीईटी २०२२ ही प्रवेश परीक्षा ०५ ऑगस्ट, २०२२ ते २० ऑगस्ट, २०२२ या कालावधीत घेण्यात येणार आहेत. तसेच कला शिक्षण विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षा १२ जून, २०२२ रोजी घेण्यात येणार आहे. सर्व संबंधीत उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, नमूद कालावधीत आपले अर्ज सादर करुन परीक्षा द्यावी व आपले भविष्य उज्वल करण्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

**(श्री. रविंद्र जगताप) भा.प्र.से.**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता तंत्रशिक्षण व कृषीशिक्षण विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षांचे सुधारीत अंदाजित वेळापत्रक

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | सीईटी परीक्षेचे नाव | सन २०२२-२३ प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक | शैक्षणिक वर्ष २०२१ मध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष अभियांत्रिकी | महा-एमएचटी-सीईटी | पीसीएम ग्रुप- ०५ ते ११ ऑगस्ट, २०२२. पीसीबी ग्रुप - १२ ते २० ऑगस्ट, २०२२ (१५, १६ व १७ ऑगस्ट वगळुन) | ५१७१३२ | ८२९५५ |
| | प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र | | | | २९०६० |
| | प्रथम वर्ष कृषी शिक्षण | | | | ११११८ |
| २ | एमबीए/एमएमएस | महा-एमबीए/एमएमएस-सीईटी | २३, २४ आणि २५ ऑगस्ट, २०२२ | १३२०३६ | ३६१४२ |
| ३ | एमसीए | महा-एमसीए-सीईटी | ०४ आणि ०५ ऑगस्ट, २०२२ | २५२०५ | ८४५८ |
| ४ | बी. एचएमसीटी | महा-बीएचएमसीटी-सीईटी | २१ ऑगस्ट, २०२२ | १५७९ | ४२९ |
| ५ | एम.एचएमसीटी | महा-एचएमसीटी-सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | ४९ | ७ |
| ६ | एम.आर्च | महा-एम.आर्च-सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | १०९४ | ३०९ |
| ७ | बी. प्लानिंग | महा - बी. प्लानिंग सीईटी | ०४ ऑगस्ट, २०२२ | -- | -- |

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता उच्चशिक्षण विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षांचे सुधारीत अंदाजित वेळापत्रक

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | सीईटी परीक्षेचे नाव | सन २०२२-२३ प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी.ए-.बीएड. बी-.एस्सी.बीएड. (चार वर्ष एकात्मिक अभ्यासक्रम) | महा- बी.ए-.बीएड. बी-.एस्सी.बी-एड. सीईटी | ०४ ऑगस्ट, २०२२ | ३९४७ | ३६४ |
| २ | बी.पी.एड. | महा बी.पी.एड.- सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | ६८७२ | ४४६२ |
| ३ | विधी ३ वर्षे | महा-विधी ३ वर्ष- सीईटी | ०३ ऑगस्ट, २०२२ व ०४ ऑगस्ट, २०२२ | ६८८७५ | १७३५० |
| ४ | बी एड. | महा- बी-एड. सीईटी | २१ ऑगस्ट, २०२२ व २२ ऑगस्ट, २०२२ | ७५५९९ | ३२४०७ |
| ५ | बी-एड.एमएड. (तीन वर्ष एकात्मिक अभ्यासक्र) | महा- बी-एड. एमएड. -सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | १५०७ | २८ |
| ६ | एम. एड. | महा-एम.एड- सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | २७७९ | १३८२ |
| ७ | एम.पी.एड. | महा-एम.पी.एड- सीईटी | २१ ऑगस्ट, २०२२ | २०३७ | ८६८ |
| ८ | विधी ५ वर्ष | महा-विधी ५ वर्ष- सीईटी | ०२ ऑगस्ट, २०२२ | २४८८२ | ८८५३ |

# शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता कलाशिक्षण विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | सीईटी परीक्षेचे नाव | सन २०२२-२३ प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | दृष्यकला पदवी व डिझाईन | एमएएच-एएसी-सीईटी | १९ जुन २०२२ | ३३६२ | ७७२ |

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | सीईटी परीक्षेचे नाव | सन २०२२-२३ प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | भौतिकोपचार | पीजीपी-सीईटी | ११ सप्टेंबर २०२२ | ५६४ | ३०१ |
| २ | व्यवसायोपचार | पीजीओ-सीईटी | ११ सप्टेंबर २०२२ | ६३ | २९ |
| ३ | स्पिच लॅग्वेज पॅथोलॉजी | एम.एससी (एसलपी)/ऑडीओ)-सीईटी | ११ सप्टेंबर २०२२ | २२ | १८ |
| ४ | प्रोस्थोटिक्स ॲण्ड ऑर्थोटिक्स | एम.एससी ए.एससी.(पी ॲण्ड ओ) सीईटी | ११ सप्टेंबर २०२२ | ०१ | ०० |